# उप निबंधक सहकारी संस्था पुणे शहर(१),पुणे

यांचे कार्यालय ५८२/डी गुलटेकडी मार्केट यार्ड पुणे ३७
ई-मेल आयडी-drcspune१@gmail.com 1470 दुरध्वनी क्रमांक ०२०-२४२६२९८८

जा.क्र.उनिपुश(१)/पुर्नविकास/ पुणे पत्रकार /गृह/ विसस/प्राधीकृत/सन २०२५ दिनांक :-30/१०/२०२५

अध्यक्ष/सचिव,

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था मर्या,
पत्रकारनगर, सिंधु इमारत, पुणे -१६.

**विषय :- विशेष सर्वसाधारण सभेबाबत प्राधीकृत अधिकारी नियुक्तीबाबत.**

संदर्भ :- १. संस्थेचा दिनांक ३०/१०/२०२५ चा प्रस्ताव.
२. सहकार व वस्त्रोद्योग विभागाचे दिनांक ०४/०७/२०१९ रोजीचे निर्देश.

वरील विषयाबाबत संदर्भिय प्रस्तावाकडे कृपया आपले लक्ष वेधण्यात येते.

२/- आपला उपरोक्त विषयाबाबतचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर अर्जान्वये आपण या कार्यालयाचे निदर्शनास आणले आहे, की आपल्या संस्थेच्या पुनर्बांधणीकरीता विकसक निवडीची प्रक्रिया पुर्ण झालेली असून सभासदांना मिळणा-या घरांच्या वाटपासाठी दिनांक ०२/११/२०२५ रोजी २.०० वाजता विशेष सर्वसाधारण सभा आयोजित केली असून सदर सभेकरीता या कार्यालयाचा प्रतिनिधी उपलब्ध करुन देणेबाबत विनंती केलेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते, की आपल्या संस्थेच्या सभासदांना मिळणा-या घरांच्या वाटपासाठी घेण्यात येणा-या सभेस प्राधीकृत अधिकारी म्हणून सौ. गलांडे- पाटील वंदना प्रशांत, सहकार अधिकारी श्रेणी-२ यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

**( मिलिंद टांकसाळे )**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था,पुणेशहर(१),पुणे.**

प्रत:- सौ. गलांडे- पाटील वंदना प्रशांत, सहकार अधिकारी श्रेणी-२

२/- याबाबत आपणास कळविण्यात येते, की सदर सभेस उपस्थित राहून अहवाल सादर करणेत यावा.